दै. मराठवाडा नेता दि. ०६/१२/२०२२

# दोन कॉफी शॉपवर विमानतळ पोलिसांची धाड

नांदेड (म.नेता)

विमानतळ पोलिसांनी शहरातील टिळकनगर व आनंदनगर येथे दोन कॉफी शॉपवर धाड घातली. विमानतळचे पोलीस निरीक्षक अनिरुद्ध काकडे त्यांच्या नेतृत्वात केलेल्या कारवाईत दोन्ही मालकांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून सापडलेल्या जोडप्यांनाही तंबी दिली.

तरूण तरूणींना मोकळे वसता यावे, गप्पा रंगाव्यात यासाठी शहरातील काही ठिकाणी आणि शहरालगत वर्दळ कमी असलेल्या भागात कॉफी शॉप नावाने अनेकांनी दुकाने थाटली आहेत. आकर्षक, रंगीबेरंगी सजावट, निवांत आणि जोडपे एकटे वसण्याची सुविधा अनेकांनी या शॉपमध्ये केली आहे. मागील काळात प्रेम प्रकरणामुळे हे कॉफी शॉप चर्चेत आले होते. बुवा, शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले होते. यामुळे पोलिसांनी अशा कॉफी शॉपविरुद्ध कारवाईची मोहिम उघडली होती. सध्या पोलिसांनी मोहिम गेल्या काही महिन्यात थंडावल्याने कॉफीची दुकानदारी पुन्हा वाढत असून कायदा व सुव्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याची दखल घेत विमानतळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिरुद्ध काकडे यांच्या मार्गदर्शनात १ अधिकारी, १ महिला पोलीस अंमलदार, ६ पोलीस कर्मचाऱ्यांनी टिळकनगर भागातील एक आणि आनंदनगर मधील राजमहल इमारतीतील १ अशा दोन ठिकाणी धाड टाकली.

यात पोलिसांना अधील वर्तन करतांना काही जोडया सापडल्या. विमानतळ पोलिसांनी त्या २ कॉफी शॉप मालकांना तंवी ठेवून तेथे सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत. दुकानात केविन न ठेवता मोकळ्या जागेमध्ये टेवल लावण्यास सांगितले. यानंतर दोन्ही कॉफी शॉप मालकांवर विमानतळ पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. पोलिसांनी संपुर्ण शहर परिसरात अशी मोहिम राववावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

पुण्य नगरी ३

दि. ०६/१२/२०२२

# सेवानिवृत्त पोलीस अंमलदार शेख अब्दुल यांचा प्रामाणिकपणा

नांदेड/प्रतिनिधी

सध्याच्या धका-धकीच्या काळात प्रामांणिक माणसे मिळणे हे दुरापास्त झाले आहे. परंतु नांदेड पोलीस दलातून निवृत्त झालेले पोहेकॉ शेख अब्दुल शेख अमीर हे पोलीस कल्याण विभाग नांदेड यांच्या तर्फे चालविण्यात येणाऱ्या पोलीस पेट्रोल पंपावर स्वेछेने नागरीकांची सेवा करीत असुन ते गाईडचे काम करतात. चार दिवसा पुर्वी जेष्ठ नागरीक सुरेंद्र सोहनलाल आवस्थी (६२, रा. तारासिंह मार्केट नांदेड) हे पेट्रोल भरण्यासाठी पोलीस पेट्रोलपंपावर आले असताना त्यांच्या खिशातून ३ हजार ८ रूपये खाली पडले होते. ते पैसे शेख अब्दुल शेख अमीर यांना सापडले. त्यांच्याकडून सापडलेल्या पैशाच्या मालकाचा शोध घेणे सुरू होते.

जेष्ठ नागरीक सुरेंद्र सोहनलाल आवस्थी, हे सोमवारी पेट्रोल पंपावर चौकशी करण्यासाठी आले असता शेख अब्दुल अमीर यांनी त्यांना सापडलेले ३ हजार ८ रुपये त्यांचेच असल्याची खात्री करुन ही रक्कम पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या समक्ष पोलीस अधीक्षक कार्यालयात जाऊन परत दिली. त्यांच्या प्रामाणिकपणाची नांदेड जिल्हा पोलीस दलात कौतुकाने चर्चा होत आहे.प्रत्येकाने त्यांचा आदर्श घेऊन काम केल्यास पोलीस दलाची प्रतिमा उंचावेल, अशी भावना पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी व्यक्त केले असून शेख अब्दुल अमीर यांचे कौतुक केले.

# सारखणी ग्रा.प.निवडणूक शांततेत पार पाडा – सपोनि तिडके



किनवट, दि.५ (ता.प्र.)– तालुक्यातील सारखणी ग्रा.प.निवडणूक शांततेत पार पाडा शांतता भंग करणाऱ्याची गय केली जाणार नाही. सिंदखेड पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या सारखणी पोलिस चौकीमध्ये आगामी काळात पार पडणाऱ्या ग्रामपंचायत निवडणूक संदर्भाने सारखणी या गावात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून त्याचे पालन व्हावे व ग्रामपंचायत निवडणूक शांततेत पार पाडावी कोणताही अनुचित प्रकार घडू नये या पार्श्वभूमीवर स्थानिक गावातील पॅनल प्रमुख, ज्येष्ठ सदस्य, नागरिक यांची शांतता समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना सपोनि भालचंद्र तिडके हे म्हणाले की, होऊ घातलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत गावातील छोटे-मोठे तंटे तसेच वाद विवाद उद्भवतील, अशा घटना गावात घडू नये यासाठी पुढाकार घेऊन गावात शांतता आबाधीत राहावी असे आवाहन केले. यावेळी पोलीस अंमलदार हकीम पठाण, शेंडे, तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक, बाबू सेठ, इकबाल सेठ, ठाकूर, लक्ष्मण मिसेवार, विशाल जाधव, रशीद फजलानी, मिलिंद कांबळे, पत्रकार मजहर शेख,जावीद चाऊस, मुजाहिद चाऊस, हुसेन शेख, सलमान खान, जीलानी शेख, नवीन वाघमारे, गजानन मिसेवार, यासह इतर नागरिक उपस्थित होते. सत्य प्रभा ६/१२/२२